**प्रेसनोट दिनांक ०१/०८/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी यांनी नागरीकांच्या OLX या वेबसाईटवर होत असलेल्या फसवणुकीचे गुन्हयांना आळा घालणेकामी नागरीकांना आवाहन करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेबाबत...**

OLX या वेबसाईट वर आर्मी,एअरफोर्स, सीआयएसएफ व इतर कर्मचारी यांचे गणवेशातील ओळखपत्र दाखवुन एअरपोर्ट मध्ये नोकरीला असल्याचे सांगुन OLX या वेबसाईटवर मोटार सायकल, मोबाईल, चारचाकी वाहने, मोबाईल हॅन्डसेट विकण्याची जाहिरात देवुन नागरीकांकडुन वाहन खरेदी व मोबाईल खरेदीसाठी ऑन लाईन, पेटीएम द्वारे भरण्यास सांगुन अनेक लोकांची फसवणकु केलेली जात असल्याने त्याबाबत एअरपोर्ट पोलीस चौकी आणि विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे अनेक नागरीकांच्या तक्रार येवु लागलेल्या होत्या.

त्यामुळे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री बळवंत मांडगे, पोलीस उप निरीक्षक श्री झांजुर्णे, पोलीस उप निरीक्षक पिंगळे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी नागरीकांनी अशा फसवणुकीला बळी पडु नये म्हणुन विमानतळ पोलीस स्टेशनचे वतीने ‘‘जाहीर आवाहन ’’ करुन सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, सध्या OLX या वेबसाईटवर मोटार सायकल, मोबाईल, चारचाकी वाहने विकण्याची जाहिरात देवुन नागरीकांकडुन वाहन खरेदी करण्यासाठी ऑन लाईन, पेटीएम द्वारे भरण्यास सांगुन अनेक लोकांची फसवणकु केलेली जात आहे. तरी कोणीही OLX या वेब साईटवरुन अशा इसमांकडुन काहीही खरेदी करु नये, अशा लोकांकडुन आपली ऑन लाईन फसवणुक होवु शकते तरी सर्वांनी सावधानता बाळगुन कोणत्याही अमिषाला बळी पडु नये अशा प्रकारचे जाहीर आवहनाचे बोर्ड एअरपोर्ट वर पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रामध्ये नगर रोड, एअरपोर्ट रोड, खराडी बायपास चौकात, तसेच पोलीस ठाणेचे इतर मुख्य ठिकठिकाणी लावल्यामुळे नागरीकांच्या होणारे फसवणुकीला मोठा आळा बसलेला आहे. तसेच वरील नमुद अधिकारी यांनी नागरीकांना हे आवाहन करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**